प्रकरण ः पहिले

# जीवन परिचय

# जीवन परिचय

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, मुत्सद्दी राजकारणी असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दिसतात. त्यापैकीच एक म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे आदर्श प्रशासकही होते.

छत्रपती शाहूंनी समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा यांच्या विरोधात अव्याहतपणे लढा दिला. त्यामधून त्यांनी नवीन सामाजिक व्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण क्षेत्रावर उच्चवर्णीयांचे असलेले वर्चस्व झुगारून देऊन सामान्य माणसासाठी शिक्षण खुले केले. शेती, पाणीपुरवठा , बाजारपेठा यांच्या माध्यमातून नवीन प्रकल्प व योजना आपल्या संस्थानात राबवून संस्थानच्या आर्थिक परिस्थितीत परिवर्तन घडवून आणले. राजकारणातील दृष्ट प्रवृत्तींना आळा घालून त्यांनी सामाजिक, राजकीय बदल घडवून आणले होते. सामाजिक सुधारणा, शैक्षणिक विकास घडवून आदर्श प्रशासनाचे नेतृत्व केले.

२६ जून १८७४ ते ६ मे १९२२ हा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा कालखंड. ४८ वर्षाच्या आयुष्यात छत्रपती शाहू महाराज यांनी २८ वर्षे राज्यकारभार केला. या कालखंडात त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय अशा विविध क्षेत्रांशी संबंधित कार्ये करत असताना क्रांतीकारक सुधारणा घडवून आणल्या. त्याचबरोबर कला, क्रिडा, साहित्य, अर्थकारण, राजकारण, सहकार, व्यापार, उद्योग अशा विविध क्षेत्रांना त्यांनी आपल्या संस्थानात उत्तेजन दिले. छत्रपती शाहूंच्या या विविध क्षेत्रातील कार्यामुळेच कोल्हापूरची गादी विभूषित झाली.

राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात प्रशासनाचा एक आदर्श घालून दिला. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी अमूलाग्र

बदल घडवून आणला. शाहू महाराज हे समाजसुधारक व उत्तम प्रशासक तर होतेच शिवाय क्रांतीकारक थोर राजे होते. यासाठीच त्यांचे जीवनकार्य समजावून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनास अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

## कोल्हापूरच्या गादीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचा मोठा मुलगा छत्रपती संभाजी महाराज यांनी राज्यकारभार आपल्या हाती घेतला. मात्र संभाजी महाराजांची कारकीर्द अत्यल्प ठरली. ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांचा वध करून औरंगजेबाने संभाजी महाराजांची पत्नी येसूबाई व मुलगा शाहू यास कैद केले.

छत्रपती संभाजी महाराजांचा वध आणि शाहूला कैद झाल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा दुसरा मुलगा छत्रपती राजाराम महाराज यांनी राज्यकारभार आपल्या हाती घेतला.

२ मार्च १७०० रोजी वयाच्या ३० व्या वर्षी सिंहगडावर राजाराम महाराजांचा मृत्यू झाला. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांची विधवा पत्नी महाराणी ताराबाई हिने आपला ३ वर्षाचा मुलगा शिवाजी यास गादीवर बसविले व राज्यकारभार आपल्या हाती घेतला.

२० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अझमशहा याने शाहूची सुटका केली. शाहूंच्या सुटकेमुळे मराठयांच्या गादीवरील वारसा हक्काबाबत शाहू व ताराबाई यांच्यात संघर्ष निर्माण झाला.

१२ जानेवारी १७०८ रोजी शाहूने मराठी राज्याचे आपण छत्रपती आहोत अशी घोषणा केली. त्याने सातारा ही आपली राजधानी बनविली.[१]

१७१० मध्ये ताराबाईने पन्हाळगडाचा आश्रय घेऊन आपला पुत्र शिवाजी

१. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.३

यास पन्हाळगडाच्या गादीवर बसविले. हा शिवाजी कोल्हापूर राजघराण्याचा पहिला छत्रपती व पहिला शिवाजी होय[२] सातारा व पन्हाळा अशा दोन गाद्या प्रस्थापित होऊनही शाहू व ताराबाई यांच्यातील संघर्ष अद्याप कायम होता.

मध्यंतरी १७१४ च्या फेब्रुवारीत पन्हाळगडावर कारस्थान होऊन राज्यक्रांती झाली. ताराबाईला सत्तेवरून पदच्युत करण्यात येऊन राजाराम महाराजांची दुसरी पत्नी राजसाबाई हिचा मुलागा संभाजी यास पन्हाळगडाला गादीवर बसविण्यात आले.[३] त्यामुळे शाहू व ताराबाई यांच्या संघर्षाचे रूपांतर आता शाहू व संभाजी यांच्या संघर्षात झाले. संभाजी व शाहू यांचा संघर्ष पुढे अनेक वर्षे चालू होता.

१४ मार्च १७२६ मध्ये ताराबाईचा मुलगा शिवाजी (I) यांचा मृत्यू झाला. संभाजी व शाहू यांच्या तंट्याचा शेवट २६ एप्रिल १७३१ रोजी वारणा तहात होऊन कोल्हापूरच्या गादीला स्वतंत्र मान्यता प्राप्त झाली.

१५ डिसेंबर १७४९ रोजी साताऱ्याचा शाहू निपुत्रिक वारल्यानंतर पुढे २० डिसेंबर १७६० रोजी संभाजीही निपुत्रिक वारल्याने शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रत्यक्ष वंशाचा याठिकाणी अंत झाला.

संभाजी महाराज निपुत्रिक वारल्याने त्यांची विधवा पत्नी राणी जिजाबाई हिने खानवटकर घराण्यातील मुलगा 'माणकोजी' यास दत्तक घेतले. तो मुलगा २७ सप्टेंबर १७६२ रोजी दुसरा शिवाजी या नावाने गादीवर आला. या दुसऱ्या शिवाजीने आपली राजधानी पन्हाळ्याहून कोल्हापूरला नेली.[४] शिवाजी (II) ला संभाजी तथा आबासाहेब आणि शहाजी तथा बुवासाहेब ही दोन मुले होती.

---

२. कित्ता -

३. कित्ता -

४. कित्ता - पृ.क्र.५

२४ एप्रिल १८१३ रोजी शिवाजी (II) चा मृत्यू झाल्यानंतर संभाजी तथा आबासाहेब हे गादीवर आले.१७ जुलै १८२१ रोजी संभाजी तथा आबासाहेब महाराजांचा खून झाला. आबासाहेब म्हाराजांच्या पश्चात शहाजी तथा बुवासाहेब महाराज गादीवर आले. २९ नोव्हेंबर १८३८ रोजी तुळजापूरच्या यात्रेला जात असताना वाटेतच बुवासाहेब महाराजांचा मृत्यू झाला.

बुवासाहेब महाराजांच्यानंतर त्याचा मोठा मुलगा शिवाजी तिसरा उर्फ बाबासाहेब महाराज यांनी राज्यकारभार आपल्या हाती घेतला.चिमासाहेब हा बुवासाहेब महाराजांचा धाकटा मुलगा तर बाबासाहेब महाराजांचा सावत्र भाऊ होय.१८५७ च्या उठावात कोल्हापूरमध्ये चिमासाहेबांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती. त्यामुळे ब्रिटिशांनी त्यांना कराची येथे 'पाईट मनोरा' येथे नजरकैदत ठेवले होते. चिमासाहेब कराचीला ११ वर्षे बंदिवासान होते. इ.स.१८६९ ते निधन पावले.[५]

४ ऑगस्ट १८६६ रोजी बाबासाहेब महाराजांचा (शिवाजी तिसरा) मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी तीनच दिवस अगोदर म्हणजे १ ऑगस्ट १८६६ रोजी त्यांनी पाटणकर घराण्यातील 'नागोजीराव पाटणकर' या मुलास दत्तक घेऊन त्याचे नाव 'राजाराम छत्रपती' असे ठवले.

राजाराम महाराज हे बाबासाहेब महाराजांच्या आऊबाई नावाच्या भगिनींचे सुपुत्र होत. तर कागलचे जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे हे बाबासाहेब महाराजांच्या 'बाळाबाई' नावाच्या द्वितीय भगिनीचे सुपुत्र होत.

राजाराम महाराजांनी शिक्षण प्रसाराचा क्षेत्रात मोठया उत्साहाने व तडफेने कार्य केले. त्यांनी शिक्षण कार्यात जी धडक दाखविली त्या प्रीत्यर्थ कोल्हापूर माध्यमिक शाळेचे नाव 'राजाराम हायस्कूल' असे ठेवण्यात आले.[६]

---

५. गर्गे स.मा. - करवीर रियासत, जो.ये.राणे प्रकाशन, पुणे, जुन १९८०,पृ.क्र.५७१
६. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.२००१, पृ.क्र.८

३० नोव्हेंबर १८७० रोजी इंग्लडहून परत येत असताना इटलीतील फ्लॉरेन्स शहरात एका लहानशा आजाराने राजाराम महाराजांचा मृत्यू झाला. राजाराम महाराज निपुत्रिक वारल्याने त्यांची विधवा पत्नी राणी सकवारबाई यांनी २३ ऑक्टोंबर १८७१ रोजी 'नारायणराव भोसले' या मुलास दत्तक घेतले. नारायण भोसले हे वयाच्या नवव्या वर्षी 'चौथे शिवाजी महाराज' या नावाने गादीवर बसले.

२५ डिसेंबर १८८३ रोजी अहमदनगरच्या किल्ल्यात चौथ्या शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला. तत्पूर्वी १८८२ रोजी 'रिजन्सी कौन्सिलं'ची स्थापना होऊन जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांची कोल्हापूरचे 'रिजंट' म्हणून नेमणूक झाली होती. आबासाहेब घाटगे हे बाबासाहेब महाराज (शिवाजी तिसरा) यांचे भाचे व इटलीतील फ्लॉरेन्स शहरात निधन पावलेल्या राजाराम महाराजांचे मावस बंधू होत. तसेच कागलच्या थोरल्या पातीचे जहागीरदार म्हणूनही त्यांना ओळखले जात असे.

चौथे शिवाजी महाराज निपुत्रिक वारल्याने त्यांच्या विधवा पत्नी आनंदीबाई साहेब यांनी आबासाहेब घाटगेचे जेष्ठ सुपुत्र यशवंत उर्फ बाबासाहेब यांना दत्तक घेतले. १७ मार्च १८८४ रोजी ते 'शाहू छत्रपती' या नावाने कोल्हापूरच्या गादीवर बसले.

**जन्म :**

छत्रपती शाहूंचा जन्म २६ जून १८७४ रोजी काल्होपूर येथील 'लक्ष्मी विलास पॅलेस' याठिकाणी झाला. सध्या हे ठिकाण 'सर्कीट हाऊस' म्हणून ओळखले जाते. 'लक्ष्मी विलास पॅलेस' हा वाडा बाबासाहेब महाराज (शिवाजी तिसरा) यांनी आपली बहिण बाळाबाई यांस लग्नात अंदण दिला होता. 'बाळाबाई' या छत्रपती शाहूंच्या आजी (वडिलांच्या आई) होत. शाहूंच्या आई राधाबाईसाहेब तर वडील जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे. शाहूंचे जनक घराण्यातील नाव यशंवत उर्फ बाबासाहेब असे होते. ३ जानेवारी १८७६ रोजी शाहूंचे बंधू पिराजीराव उर्फ बापूसाहेब यांचा जन्म झाला.

१८७७ रोजी शाहूंच्या आई राधाबाईसाहेब यांचे निधन झाले. राधाबाई साहेब यांच्या निधनानंतर आबासाहेब घाटगे यांनी १८७८ मध्ये चिपळूण तालुक्यातील कुचंबा गावच्या राधाबाई यांच्याशी दुसरा विवाह केला होता.

१८७८ साली कागल जहागीरीची सुत्रे आबासाहेब घाटगे यांच्याकडे आली. त्यानंतर १८८२ रोजी कोल्हापूरचे 'रिजंट' म्हणून त्यांची नेमणूक झाली. २५ डिसेंबर १८८३ रोजी चौथ्या शिवाजी महाराजांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या विधवा पत्नी आनंदीबाईसाहेब यांनी आबासाहेब घाटगेचे जेष्ठ सुपुत्र यशवंत उर्फ बाबासाहेब यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेऊन त्याचे नाव 'शाहू महाराज' असे ठेवले. यांनाच पुढे कोल्हापूरचे 'सुविख्यात समाजोद्धारक' हे नामाभिधान प्राप्त झाले.

**शिक्षण :**

'दत्तक समारंभ पार पाडताच आबासाहेब घाटगेनी शाहू, बापूसाहेब, काकासाहेब व दत्ताजी इंगळे यांच्या शिक्षणासाठी कृष्णाजी भिकाजी गोखले आणि हरिपंत गोखले यांची शिक्षक म्हणून नेमणूक केली. पण शिक्षणाची संपूर्ण व्यवस्था ब्रिटिश राजनैतिक उपप्रतिनिधी फिट्झिराल्ड यांच्या देखरेखेखाली करण्यात आली होती.'[७] फिट्झिराल्ड यांची शिक्षणाधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली होती.[८]

शिक्षणासाठी आपल्या मुलांना परदेशी पाठवावे अशी आबासाहेब घाटगेंची इच्छा होती. मात्र मार्च १८८५ ते सप्टेंबर १८८५ या कालावधीत लंडनचा दौरा करून परत आल्यानंतर आबासाहेब घाटगेंनी आपल्या विचारात बदल करून आपल्या मुलांना शिक्षणासाठी परदेशी न पाठवता राजकोटला राजकुमार महाविद्यालयात पाठविण्याचा निर्णय घेतला.

जानेवारी १८८६ ला शाहू व त्यांच्या सहाध्यायींना शिक्षणासाठी

---

७. कित्ता - पृ.क.१६

८. लट्ठे अ.बा. - श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, बी.ल.पाटील, कोल्हापूर, १९२५ पृ.क्र. २८

राजकोटला राजकुमार महाविद्यालयात पाठविण्यात आले. राजकुमार महाविद्यालयात शाहू व त्यांच्या सहाध्यायींचा शिक्षणक्रम सुरू होतो न होतो तोच २० मार्च १८८६ रोजी वयाच्या ३० व्या वर्षी अतिमद्यपानामुळे आबासाहेब घाटगेंचे निधन झाले. आबासाहेबांच्या मृत्यूला जी गोष्ट कारणीभूत होती. तिचा महाराजांच्या मनावर कायमचा परिणाम झाला. त्यामुळेच सर्व आयुष्यभर मद्यपानाविषयी त्यांच्या मनात पराकाष्टेचा किळस उत्पन्न झाला. त्यांनी आपल्या संपूर्ण हयातीत कधीही मद्याच्या थेंबालादेखील स्पर्श केला नाही.

१८८६ ते १८८९ या कालावधीत शाहू व त्यांच्या सहाध्यायींनी प्राचार्य मॅकनॉटन यांच्या देखरेखीखाली राजकोट येथील राजकुमार महाविद्यालयात शिक्षण घेतले. शिक्षणाबरोबर कुस्ती, शिकार, लष्करी-संचलन, नेमबाजी, घोडेस्वारी इ. चे आवश्यक ते ज्ञान त्यांना देण्यात आले. कुस्ती हा महाराजांचा आवडता खेळ [९] शिवाय घोडेस्वारी आणि शिकार यांची ही महाराजांना विशेष आवड होती.

राजकोट येथील हवा महाराजांच्या प्रकृतीला मानवत नसल्यामुळे १८८९ सालच्या प्रारंभी महाराजांनी धाडवाडास जाऊन मि. एस. एम. फ्रेजर यांच्या देखरेखेखाली आपला शिक्षणक्रम पूर्ण करावा असे ठरले. त्यानुसार एप्रिल १८८९ ला शाहू व त्याचे सहाध्यायी राजकोट येथील राजकुमार महाविद्यालय सोडून कोल्हापूरला परतले.

शाहूंच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था धारवाड येथे करण्यात आली होती. त्यासाठी २२ मे १८८९ रोजी स्टुअर्ट मिलफोर्ड फ्रेजर यांची शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली.

११ जून १८८९ यादिवशी शाहू व त्यांचे सहाध्यायी यांचे धारवाड येथे शिक्षण सुरू झाले. धारवाडमध्ये शाहूंचे सहाध्यायी म्हणून बापूसाहेब, काकासाहेब, दत्ताजी

---

९. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.१९

इंगळे होते. त्याचबरोबर भावनगरचे भावसिंहजी ही होते. भावनगरचे राजकुमार जरी या छात्रगणापैकी नव्हते, तरी तेही मि.फ्रेजर यांच्या सहवासात राहत.[१०] भावसिंहजी यांच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देण्यासाठी प्रभाशंकर दलपतराय पट्टणी यांची नेमणूक फ्रेजर यांच्या हाताखाली सहायक शिक्षक म्हणून करण्यात आली.[११] या शिक्षकाव्यतिरिक्त केशवराव गोखले नावाचे एक शिक्षक होते.

**विवाह :**

धारवाड येथे शिक्षण घेत असताना १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे सरादार गुणाजीराव खानविलकर यांच्या कन्या 'लक्ष्मीबाईसाहेब' यांच्याशी शाहू छत्रपतींचा विवाह झाला. विवाहसमयी शाहू छत्रपती १७ वर्षाचे तर लक्ष्मीबाईसाहेब या ११ वर्षाच्या होत्या. विवाह समारंभ पार पडताच आपला उर्वरित शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी महाराज धारवाडला परत गेले. धारवाडला १८८९ ते १८९३ म्हणजेच सुमारे चार वर्षे राहून मि.फ्रेजर यांच्या देखरेखेखाली महाराज व त्यांच्या सहाध्यायींनी आपला शिक्षणक्रम पूर्ण केला.

धारवाड येथील शैक्षणिक कालावधीत मि.फ्रेजर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना आवश्यक ते ज्ञान दिलेच शिवाय त्यांच्या ज्ञानात व अनुभवात भर पडावी या उद्देशाने तीन वेळा आपल्या विद्यार्थ्यांसह हिंदुस्थानचा दौरा केला. त्यामध्ये दोनवेळा उत्तर हिंदुस्थानचा आणि एकवेळा दक्षिण हिंदुस्थानचा दौरा केला.

शिकवणीच्या शेवटच्या वर्षात फ्रेजर यांनी आपल्या राजशिष्यांना राज्यकारभारासाठी उपयुक्त अशा विषयांवर बरीच व्याख्याने दिली. राज्यकारभाराची तत्त्वे, कायदे करण्याची पद्धती, विधिशास्त्र, ब्रिटिशांशी झालेले संधी याविषयीचा अभ्यास करून घेतला.

---

१०. लट्ठे आ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर, १९२५ पृ.क्र.३८

११. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.२१

शाहूराजे व बापूसाहेब यांना ग्रामीण व जिल्हा पोलिस पद्धत, भारतीय दंडविधान, फौजदारी प्रक्रिया संहिता या विषयांचे फ्रेजर यांनी ज्ञान दिले होते. त्यांना जून्या व नवीन जमीनधारा पद्धतीची माहिती तसेच संस्थानामधील एलिएमेशन सेटलमेंट' चीही माहिती देण्यात आली. शिवाय ग्रामीण धान्यांचा हिशेब कसा ठेवतात आणि खाजगीतील हिशेब कसे ठेवतात याचाही त्यांनी अभ्यास केला.[१२]

थोडक्यात राज्यकारभारासाठी उपयुक्त अशा विविध विषयांचे ज्ञान गुरू फ्रेजर यांनी आपल्या राजशिष्यांना दिले.

शाहूंचे शिक्षक केशवराव गोखले हे सेवानिवृत्त होण्यापूर्वी रजेवर गेल्यामुळे जानेवारी १९८३ ला रघुनाथ व्यंकोजी सबनीस यांची शाहूंचे 'देशी शिक्षक' म्हणून नेमणूक करण्यात आली. महाराजांच्या अध्ययन काळाच्या शेवटच्या वर्षाची दुसरी टर्म १५ नोव्हेंबर १८९३ ला पूर्ण झाली. तत्पूर्वीच महाराजांच्या हाती सर्व अधिकारसूत्रे देण्याचा निर्णय सरकारने यापूर्वीच जाहीर केला होता.

**स्वराज्यातील दौरा :**

शिक्षणक्रम पूर्ण होताच प्रत्यक्ष राज्यकारभाराची सूत्रे हाती घेण्यापूर्वी शाहूंनी आपले गुरू फ्रेजर व बंधु बापूसाहेब यांना बरोबर घेऊन आपल्या संपूर्ण संस्थानचा दौरा केला. राज्यारोहणापूर्वी राज्यकारभाराच्या प्रशिक्षणाचा एक आवश्यक भाग म्हणून महाराजांकडून त्यांच्या शिक्षकांनी संस्थानच्या सर्व भागाचा दौरा करवून घेतला.[१३]
शिवाय आपल्या संपूर्ण संस्थानच्या एकंदरीत परिस्थितीची कल्पना यावी हा या दौऱ्यापाठीमागील महाराजांचा उद्देश असावा.

कोल्हापूरच्या भूतपूर्व महाराजांपैकी एकानेही आपल्या राज्यातील सर्व तालुका ठिकाणांची ही पाहणी केली नव्हती. परंतु राज्यातील सर्व तालुक्यांच्या ठिकाणांनाच नव्हे तर आपल्या अधिपत्याखालील जहागीरदारांच्या ठिकाणानांही भेटी

---

१२. कित्ता - पृ.क.३६
१३. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,२००७, पृ.क्र.२१

देणारा शाहू छत्रपती हाच कोल्हापूरचा पहिला राजा होय.[१४]

शाहूंनी स्वराज्यातील कचेऱ्या, शाळा व दवाखाने यांची पाहणी केली. गरीब लोकांमध्ये, शेतकऱ्यांमध्ये मिसळून चर्चेच्या माध्यमातून त्यांच्या परिस्थितीची व राहणीमानाची चौकशी केली. या दौऱ्यांच्या माध्यमातून त्यांना संस्थानातील प्रजेच्या वास्तववादी जीवनाची कल्पना आली. लोकांचे प्रश्न, अडी-अडचणी यांची त्यांना जाणीव झाली. त्यामुळे आपल्या राज्यकारभाराची दिशा निश्चित करणे त्यांना शक्य झाले.

यावरून असे म्हणता येईल की, राज्यकारभाराची सुत्रे हाती घेण्यापूर्वी आपल्या संपूर्ण संस्थानची पाहणी करणारा छत्रपती शाहू हा दूरदृष्टीचा राजा होता. धोरणनिश्चिती करताना किंवा योजनांची आखणी करत असताना अशा अभ्यासपूर्ण दौऱ्याचा उपयोग होत असतो. तरच घेतलेले निर्णय अचूक ठरत असतात. याचा प्रत्यय छत्रपती शाहूंनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच उद्‌भवलेल्या आस्मानी आपत्ती १८९७-९९ च्या काळातील दुष्काळ आणि १८९८-९९ ची प्लेगची भयानक साथ यांच्याशी जो यशस्वीपणे लढा दिला यावरून येतो.

१८९९ चा दुष्काळ जो संपूर्ण भारतात निर्माण झाला होता. त्या दुष्काळात संपूर्ण देशात १0 लाखाहून अधिक लोक मृत्यूमुखी पडले होते. परंतु कोल्हापूर संस्थानात मात्र एकही दुष्काळ बळी पडला नाही.[१५] याचे सर्व श्रेय छत्रपती शाहूंच्या दूरगामी नेतृत्वाला व अभ्यासपूर्ण नियोजनाला जाते.

यावरून असे म्हणता येईल की,राजर्षी शाहू महाराज हा एक धोरणी राजा होता. आपले जीवन केवळ राजवैभवात सुख उपभोगण्यात व भोग विलासात व्यतित न करता त्यांनी स्थळ, काळ, परिस्थिती यांचे भान राखून राज्यप्रशासन केले. त्यामुळे ते एक आदर्श प्रशासन निर्माण करू शकले व एक आदर्श प्रशासक म्हणून नावारूपास आले.

---

१४. कीर धनंजय - राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२00१, पृ.क्र.३५

१५. जाधव रमेश - लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, ऑगस्ट १९९७, पृ.क्र.८६-८७

**प्रभाव :**

व्यक्तीच्या हातून जेंव्हा अफाट असे कार्य घडत असते तेव्हा त्यापाठीमागील कारणमीमांसा करताना असे लक्षात येते की व्यक्तींच्या जडणघडणेचा बऱ्याचअंशी तिच्या कार्यावर प्रभाव पडतो. कारण जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर व्यक्तीला जे शिकायला व अनुभवायला मिळते त्यातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते. त्यातून व्यक्तीचे विचार पक्के होऊन व्यक्ती कार्य करण्यास प्रवृत्त होत असते. शाहूंच्या हातून जे अफाट असे काम झाले त्यापाठीमागे त्यांच्या जडणघडणेचाही मोठा वाटा होता. शाहूंच्या जडणघडणेत आई-वडील, घराण्याचा पूर्वइतिहास, गुरू, तत्कालीन परिस्थिती इ. चा मोठा वाटा होता. शाहूंना आई-वडिलांचा सहवास फारकाळ लाभला नाही. कारण शाहू तीन वर्षाचे असताना त्यांच्या आई राधाबाईसाहेब यांचे निधन झाले. तिसाव्या वर्षी विधूर झालेल्या आबासाहेबांनी दुसरा विवाह केला. सावत्र आईची सावत्रपणाची नैसर्गिक भावना आणि पित्याचे अतिरिक्त मद्यपान या गोष्टीचा शाहूंच्या मनावर काहीसा परिणाम झाला. त्यामुळे शाहूंच्या स्वभावात सुरूवातीस धुम्मेपण आले होते.[१६]

वयाच्या तिसाव्या वर्षी अतिमद्यपानामुळे आपले वडील आबासाहेब घाटगे यांचा झालेला मृत्यू पाहून आयुष्यभर छत्रपती शाहू महाराज मद्यपानापासून व मद्यपी लोकांपासून दूर राहिले.

घराण्याच्या पूर्वेइतिहासाचा शाहूंवर प्रभाव असल्याचे जाणवते. शककर्ते छत्रपती शिवाजी महाराजांचा शाहूंवर मोठा प्रभाव होता. शिव छत्रपतींच्या सामाजिक बांधिलकीच्या कार्याचा छत्रपती शाहूंना मोठा अभिमान होता. कारण आपला मुलगा 'प्रिन्स शिवाजी' यांच्या मृत्यूनंतर शाहूंनी आपले उर्वरित आयुष्य पददलितांच्या उद्धारासाठी खर्ची घालण्याचे ठरविले. लोकांमध्ये ऐक्य आणि बंधूभाव निर्माण करण्याचे

---

१६. सुर्यवंशी कृ. गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क्र.२६

कार्य करत असताना त्यांनी आपल्या अनेक भाषणाच्या माध्यमातून शिवछत्रपतींच्या सामाजिक कार्याचा दाखला लोकांसमोर ठेवलेला दिसतो.

खामगाव येथील २७ डिसेंबर १९१७ च्या आपल्या भाषणात महाराज म्हणतात, "सतराव्या शतकात होऊन गेलेल्या आमच्यातील थोर व पूज्य विभूति छत्रपती श्री शिवाजी महाराज यांनी आपणापुंढे ठेविलेले ध्येय आज विसाव्या शतकात आपल्या नजरेपुढे ठेविले पाहिजे व त्यांचे अनुकरण केले पाहिजे......

......थोरल्या शिवाजी महाराजांनी जे उदाहरण घालून दिले आहे त्याकडे दुर्लक्ष करू नये. फलटणच्या निंबाळकर घराण्यातील एका पुरूषाने मुसलमानी धर्माची दिक्षा घेऊन एका मुसलमान स्त्रीशी लग्न केले होते. त्या पुरूषास त्या थोर विभूतीने पुन्हा आपल्या जातीत घेतले आणि आपल्या परमपूज्य मातोश्री श्री जिजाबाईसाहेब यांच्या संमतीने त्यांनी निंबाळकरांच्या मुलाशी आपल्या स्वत:च्या मुलीचा विवाह करून दिला."[१७]

नाशिक येथील १५ एप्रिल १९२० च्या आपल्या भाषणात शिवछत्रपतींच्या कार्याचा गौरव करताना महाराज म्हणतात, "श्री शिवाजी छत्रपतींनी तर मुसलमानांचे मराठे करून घेतले व देशकार्याकरिता महार मागांचे रिसाले व तोफखाने तयार करून स्पर्शास्पर्शाच्या विचारास जबर धक्का दिला."[१८] यावरून असे लक्षात येते की, छत्रपती शाहूजवळ असणाऱ्या परधर्मसहिष्णूता व धर्मनिरपेक्षता या गुणांचा ठेवा शिवछत्रपतींकडून त्यांना लाभला होता.

छत्रपती शाहूंनी कोणत्याही एकाच धर्माला आपल्या संस्थानात अधिक महत्त्व दिले नव्हते. तसेच कोणत्याही धर्माला गौण लेखले नाही. छत्रपती शाहूंच्या प्रशासनात मराठे, ब्राम्हण, पारशी, मुसलमान अशा विविध धर्माचे लोक होते.

विविध कलागुणांना प्रोत्साहन देताना देखील महाराजांनी कधीही जात, धर्म

---

१७. जाधव भ.बा. - राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र. ५-६

१८. कित्ता - पृ.क्र. ६९

याबाबीवरून भेदभाव केला नाही. महाराजांच्या दरबारातील गानसम्राज्ञी, गानमहर्षी, तालमीतील विविध जाती-धर्माचे असणारे मल्ल यांचा संदर्भ लक्षात घेता याचा प्रत्यय येतो. शिवाय महाराजांनी पवित्र कुराणाचे मराठीत भाषांतर करून घेतल्याचाही संदर्भ सापडतो. यावरून शाहूंच्या परधर्मसहिष्णूता व धर्मनिरपेक्षता या गुणांचा प्रत्यय येतो.

शाहूंचे गुरू सर स्टुअर्ट मिलफोर्ड फ्रेजर व सर रघुनाथ व्यंकोजी सबनीस यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि शिकवणीचा शाहूंवर मोठा प्रभाव होता. फ्रेजर हे उदारमतवादी व कर्तव्यनिष्ठ शिक्षक होते. तसेच ते सालस, सज्जन व विवेकी गृहस्थ होते. इंग्रजांचा उद्दामपणा, श्रेष्ठत्त्वाचा अहंकार आणि मखलाशी वागणे, बोलणे यांचा त्यांच्याठायी अभाव होता. संयमीपणा, कर्तव्यदक्षता आणि जिद्द इत्यादी गुण त्यांच्या ठिकाणी होते.[१९]

आपला शिष्य एक आदर्श राज्यकर्ता बनावा यासाठी फ्रेजरनी नियोजबद्धरित्या त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण केला. त्यासाठी फ्रेजरनी नियोजबद्ध व अतिशय अभ्यासपूर्वक राजकुमारांच्या शिक्षणाची आखणी केली होती.

वेळापत्रकाची आखणी अशी खुबीदारपणे केली की, उठल्यापासून झोपेपर्यत कुमार कसल्या ना कसल्या तरी अध्ययन उपक्रमात दंग राहतील. कुमारांना अनिष्ठ छंद जडायला व विघ्नकारक फंदात पडायला मुळी रिकामा अवसरच मिळू नये अशी व्यवस्था केली.

सकाळी साडेसहाला उठणे, घोडयावरून रपेट मारणे व नेमबाजी करणे. दहा ते एक आणि तीन ते पाचपर्यत वर्गशिक्षण. पाच ते आठ कवायत, खेळ आणि सारथ्य. रात्री गृहपाठ व स्वाध्याय. नंतर झोप हा कुमारांचा आखीव व रेखीव दिनक्रम सुट्टीच्या दिवशी व रविवारी शिकारीचा कार्यक्रम.[२०]

---

१९. सुर्यवंशी कृ. गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ. क. ३५

२०. कित्ता - पृ. क्र. ३६-३७

पुस्तकातून वाचलेल्या आणि कानांनी ऐकलेल्या गोष्टींपेक्षा समक्ष डोळयांनी पाहिलेल्या गोष्टींचा परिणाम माणसाच्या मनावर अधिक ठसतो. आपल्या देशाची देश बांधवांची, भूप्रदेशाच्या रचनेची, संस्कृतीची, स्फूर्तिदायक ऐतिहासिक स्थळांची, तीर्थ क्षेत्रांची नव्या नगरांची व त्यांच्या वैशिष्ट्यांची शाहूमहाराजास माहिती व्हावी या उद्देशांनी आचार्य फ्रेजर यांनी दोन उत्तर भारतात व एक दक्षिण भारतात अशा शैक्षणिक सहलींची आखणी केली होती.[२१] शाहू व आचार्य फ्रेजर यांचा सहवास केवळ अध्ययन अध्यापन यापुरता मर्यादित नव्हता. तर राज्यप्रशासन चालवत असताना शाहूंच्या समोर जेव्हा आव्हानात्मक प्रसंग उद्भवत तेव्हा शाहू आपल्या गुरूंकडे सल्ला मागत होते. गुरू शिष्यांचा हा संवाद शाहूंच्या जीवनाखेर अखंड ३३ वर्षे सुरू होता. म्हणूनच आपल्या गुरूचा यथार्थ शब्दात गौरव करताना शाहूंनी त्यांना आपला Friend, Philoshoper, Guide असे म्हटले होते.

यावरून असे लक्षात येते की, उदारमतवादी दृष्टीकोन, संयमीपणा, कर्तव्यनिष्ठता, नियोजनबद्ध कार्यपूर्ती इत्यादी गुणांचा ठेवा महाराजांना गुरू फ्रेजर यांच्याकडून लाभला होता. गरीब जनता, पददलित यांच्याविषयी महाराजांना खूप आपुलकी व आपलेपण वाटत होते. त्यांनी आपल्या आयुष्यात जे काही कार्य केले त्या कार्यात पददलितांच्या कार्यास प्राधान्य दिले.

शाहूंच्या मनात पददलितांविषयी जिव्हाळा निर्माण होण्यास काही अंशी फ्रेजरचा शाहूंना लाभलेला सहवास कारणीभूत ठरला असावा कारण लठ्ठे म्हणतात, "आपल्या गुरूविषयी महाराजांना पराकाष्टेचा आदर व प्रेम वाटत होते. महाराजांचे अंत:करण तयार होण्यास जी अनेक कारणे तयार झाली त्यामध्ये मि. फ्रेजरसारख्या मनुष्याची सहानुभूती व इतरांची कठोर हृदयी बेपर्वाई या दोहोंमधील महदतंराचा महाराजांना आलेला अनुभव हा कमी महत्त्वाचा मानता येणार नाही."[२२]

२१. कित्ता - पृ.क्र. ४१
२२. लठ्ठे आ.बा.- श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र,बा.ल.पाटील, कोल्हापूर,१९२५ पृ.क्र.७२

महाराजांचे दुसरे गुरू म्हणजे रघुनाथ व्यंकोजी सबनीस. महाराजांचा सबनीसांशी संबंध १८९४ च्या प्रारंभी शिक्षक म्हणून झाला. महाराजांच्या १८९४ ते १९२२ पर्यंतच्या अठ्ठावीस वर्षाच्या कारकीर्दीचा देखता जागता एकमेव साक्षीदार म्हणजे रघुनाथ व्यंकोजी सबनीस.

सबनीस मनमिळावू, बुद्धिने तल्लख, मनाने सरळ, वृत्तीने प्रेमळ होते. तसेच ते कार्यकुशल, कष्टाळू, प्रामाणिक, सत्यप्रिय व निष्ठावंत होते. अहंकाराचा वारा त्यांनी कधी आपणास लागू दिला नाही. त्याचप्रमाणे सत्तेचा उद्दामपणा आणि प्रसिद्धीचा झोत यापासून ते कटाक्षाने दूर राहिले. ते खऱ्या अर्थाने हाडाचे शिक्षक होते. योग्य ते बोलणे, उचित ते करणे, रास्त सल्लामसलत देणे, जे गुणकारी व कल्याणकारी असेल त्याचाच पाठपुरावा करणे आदी आदर्श शिक्षकास शोभून दिसतील अशीच कर्तव्ये त्यांनी सचोटीने आणि अभंग निष्ठेने पार पाडली.[२३] सबनीसांच्या या विविध गुणांचा मोठा प्रभाव शाहू छत्रपतींवर पडला होता. म्हणूनच १९१५ साली सबनीसांच्या कार्याचा गौरव करताना महाराजांनी म्हटले होते.

मेहरबान रावबहाद्दूर रघुनाथ सबनीस सी.आय.ई. दिवाणसाहेब यांचा संबंध करवीर संस्थानशी पूर्वीच्या पुष्कळ दिवसांपासून पिढीजात आहे व विशेषकरून आमच्या लहान असल्यापासून आमच्याशी व आमच्या घराण्याशी निकट संबंध आला आहे. आम्ही जो काही बरा-वाईटपणा मिळविला असेल त्याचे सर्व श्रेय दिवाण साहेबांकडेच आहे. आम्हास जे अधिकार मिळाले व आमच्या कारकीर्दित संस्थानचा जो फायदा झाला असेल त्या सर्वास रावबहाद्दूर सबनीस हेच कारणीभूत आहेत.[२४]

देश-विदेशातील पर्यटनांनी शाहू खूपच प्रभावित झाले होते. विद्यार्थी दशेत असताना शाहूंनी गुरू फ्रेजर यांच्याबरोबर दोनवेळा उत्तर हिंदुस्थानचा व एकवेळा

२३. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८४ पृ.क.५८

२४. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.३१

दक्षिण हिंदुस्थानचा दौरा केला होता. या पर्यटनामुळे शाहूंना आपल्या देशाचे, देशाच्या संस्कृतीचे, राहणीमानाचे, स्फूर्तिदायक ऐतिहासिक स्थळांचे जवळून दर्शन झाले.

राज्यकारभाराची सूत्रे हाती घेण्यापूर्वी आपले बंधू बापूसाहेब आणि गुरू फ्रेजर यांना बरोबर घेऊन आपल्या संपूर्ण संस्थानचा दौरा केला. या स्वराज्यातील दौऱ्यामुळे त्यांना आपल्या रयतेच्या वास्तविक परिस्थितीची जाणीव झाली.

राजवैभव ही शोभेची वस्तू नसून लोकसेवेचे ते एक साधन आहे. याची जाणीव रयतेच्या खऱ्या दर्शनाने त्यांना आली त्यामुळेच आपल्या राजसत्तेचा उपयोग त्यांनी आयुष्यभर लोककल्याणासाठी केला. गरीब,पददलित जनतेची असहायता पाहून त्यांच्या उद्धाराच्या कार्यास प्राधान्यक्रम दिले.

सातव्या एड्वर्डच्या राज्यारोहण समारंभास उपस्थित राहण्यासाठी १९०२ साली महाराज इंग्लडला गेले होते. इंग्लिश गृहस्थाच्या ठिकाणी असणारी कडकशिस्त, व्यवहारयोग्यगुण, चोख प्रामाणिकपणा, सत्याची व न्यायाची आवड, स्वार्थत्यागपूर्वक कार्य करण्याची हौस, परकाष्ठेची चिकाटी व परक्या लोकांशी असणारे पराकाष्ठेचे दाक्षिण्य इत्यादी गुणांनी महाराज खूपच प्रभावित झाले होते. इंग्लंडने जगामध्ये जे विलक्षण यश संपादन केले आहे त्या यशाचे गमक हेच असावे अशी त्यांची (महाराजांची) खात्री झाली.[२५]

इंग्लिश गृहस्थाच्या ठिकाणी असणाऱ्या या गुणांनी महाराज खूपच प्रभावित झाले होते. आपल्या प्रशासनातील प्रत्येक माणसाच्या ठिकाणी वरील सद्गुण असावेत असे महाराजांना वाटत होते. त्यामुळेच व प्रशासनात पारदर्शकता, कार्यक्षमता, वक्तशीरपणा निर्माण व्हावी यासाठी महाराजांनी विविध कायदेकरून सुधारणा घडवून आणल्या.

तसेच इंग्लंडमध्ये असणाऱ्या भौतिक सुखसुविधा जसे सार्वजनिक भव्य इमारती, सुंदर पटांगणे, बागबगीचे, भूगतरेल्वे, वाहने, मोठमोठे कारखाने इत्यादी

२५. लट्ठे आ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर, १९२५ पृ.क्र.२०५

सुखसुविधांनी महाराज प्रभावित झाले होते. त्यामुळेच कुस्त्यांचा खासबाग आखाडा, शाहू मिल,पॅलेस थिएटर यासारख्या भौतिक सुविधांचा त्यांनी आपल्या संस्थानात पाया घातला.

शाहू महाराजांच्या जीवनावर तत्कालीन आर्यसमाज, सत्यशोधक समाज, थिऑसॉफिकल सोसायटी व अमेरिकन प्रेसबिटेरियन मिशन यासारख्या संस्थांच्याही कार्याचा व तत्त्वांचा मोठा प्रभाव होता.

आर्य समाजाने जातीभेदास तीव्र विरोध, स्त्री शिक्षण आणि पुनर्विवाह यासारख्या तत्त्वांचा पुरस्कार केला. छत्रपती शाहूंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकल्यनांतर असे लक्षात येते की, छत्रपती शाहूंनी जातीभेद उच्चाटनाचे, स्त्रीशिक्षणाचे कार्य केले. तसेच आपल्या संस्थानात विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करून त्यांनी जूलै १९१७ ला विधवा पुनर्विवाहाचा कायदा केला होता.

यावरून असे म्हणता येईल की आर्यसमाजाच्या तत्त्वांचा शाहूंवर प्रभाव होता. आर्य समाजाच्या कार्याने प्रभावित होऊन जानेवारी १९१८ ला महाराजांनी आपल्या संस्थानात आर्य समाजाची स्थापना केली होती.

आर्य समाजाची स्थापना कोल्हापूरात होण्यापूर्वी म्हणजे ११ जानेवारी १९११ साली महाराजांच्या राजाश्रयाखाली 'श्री शाहू सत्यशोधक समाजाची'स्थापना झाली होती. जातीभेदाला विरोध करणाऱ्या सत्यशोधक समाजाला छत्रपती शाहूंनी आपल्या संस्थानात उर्जितावस्था प्राप्त करून दिली होती.

सर्व धर्माप्रत सारखाच आदर ठेवणाऱ्या व सर्व धर्माचा समतोल अभ्यास करणाऱ्या 'थिऑसॉफीच्या प्रभावाखाली ही काही काळ महाराज गेले होते. पण थिऑसॉफिच्या अध्यात्मवादी तत्त्वचर्चेची खुद्द महाराजांना आवड असली तरी ती तत्त्वचर्चा महाराष्ट्रातील सामान्य माणसाचे धार्मिक व सामाजिक प्रश्न सोडवू शकत नाही. याचे भान आल्यावर ते थिऑसॉफीच्या प्रभाव कक्षेतून बाहेर पडले.[२६]

२६. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.३३, ३४

महाराजांच्यावर ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या कार्याचा मोठा प्रभाव होता. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत अस्पृश्य मुलांना किती आपलेपणाने, ममतेने बरोबरचे स्थान देऊन वागविले जाते. हे महाराजांनी पाहिले होते. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या या मानवतावादी दृष्टीकोनाचा महाराजांवर मोठा प्रभाव होता.

त्यामुळेच आरोग्य व शिक्षण खात्यात अस्पृश्यांना समानतेची वागणूक देणे, कोल्हापूरच्या नगरपालिकेत अस्पृश्यांना खास प्रतिनिधित्व देणे, पदोन्नोतीची संधी उपलब्ध करून देणे,पाण्याचे नळ,तलाव, विहिरी, धर्मशाळा अशा ठिकाणी अस्पृश्यता न पाळणे, अस्पृश्यांच्या स्वतंत्र शाळा रद्द करणे या सर्व गोष्टी शाहूंनी अतिशय आत्मीयतेने केल्या.

संस्थानची अधिकारसूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांना संस्थानच्या एकंदरीत परिस्थितीची दुरावस्था लक्षात आली. संस्थानच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय इ. परिस्थितीत कमालीचा असमतोल निर्माण झाला होता. शिक्षणाच्या व सत्तेच्या जोरावर एका विशिष्ट वर्गाची होणारी भरभराट व अज्ञानामुळे सामान्य माणसांचे होणारे हाल महाराजांनी पाहिले होते. त्यामुळे सामान्य माणसाचं उद्धान हा त्यांनी आपल्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू मानला व त्यादृष्टीने त्यांनी राज्यसूत्र संचलन केले.

अशाप्रकारे विविध घटकांचा कमी-अधिक प्रमाणात महाराजांवर प्रभाव पडून महाराजांचे व्यक्तिमत्त्व घडले होते. त्यामुळेच त्यांच्या हातून अफाट असे कार्य घडले.

**अधिकारप्राप्ती :**

धारवाडला जवळ-जवळ चार वर्षे राहून मि. फ्रेजर यांच्या देखरेखीखाली महाराजांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर कोल्हापूरमध्ये महाराजांना जे उच्चासन मंडित करावयाचे होते. त्यासंबंधी आपली कर्तव्ये करण्यास ते योग्य झाले. प्रत्येक नियतकालिकाच्या शेवटी महाराजांच्या व त्यांच्या सहाध्यायांच्या प्रगतीविषयी जे अहवाल शिक्षकांकडून सादर करण्यात येत. यावरून महाराजांना जे उत्कृष्ट शिक्षण दिले जात होते. त्याची चांगलीच कल्पना येते. [२७]

---

२७. लट्ठे आ. बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र,बा. ल. पाटील, कोल्हापूर,१९२५ पृ. क्र. ३८

आचार्य फ्रेजर यांनी आपले शिष्य शाहू यांच्यासंबंधी ब्रिटिश राज्यकर्त्यांना वेळोवेळी जे अहवाल सादर केले, गुप्त माहिती दिली आणि स्वतः तत्संबंधी तोंडी चर्चा केली व विचारविनिमय केला. त्यामुळे ब्रिटिशांच्या वरिष्ठ वर्तुळात शाहूंविषयी अनुकूल वातावरण निर्माण झाले. या पोषक वातावरणामुळेच शाहूंना वयाची वीस वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच अधिकारसूत्रे देण्यास हिंदूस्थान सरकारने अनुमती दिली.[२८]

२ एप्रिल १८९४ या दिवशी छत्रपती शाहू महाराज यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. 'कौन्सिल ऑफ अॅडमिनिस्ट्रेशन यांच्याकडून राज्यकारभाराची सूत्रे काढून घेऊन राज्यपाल लॉर्ड हॅरिस यांनी शाहू छत्रपतींकडे सुपुर्द केली. या दिवसापासून शाहू छत्रपतीचा राज्यकारभार सुरू झाला.

राज्यारोहण प्रसंगी शाहू छत्रपती वीस वर्षाचे होते. कल्याणकारी राज्यकारभार करून आपल्या संस्थानातील लोकांचे दैन्य व दारिद्र्य दूर करून त्यांना सुखी, समाधानी जीवन देणे हे त्यांचे अद्यकर्तव्य होते. साहजिकच आपल्या पहिल्याच जाहिरनाम्यात त्यांनी ते स्पष्ट केले. जाहिरनामा पुढीलप्रमाणे होता...

"आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे संस्थानची हर एक प्रकारे सदोदीत भरभराट होत जावी अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यास आमच्या पदरचे सर्व लहानथोर, जहागीरदार, आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार, व्यापारी आदिकरून तमाम प्रजाजन शुद्ध अंत:करणापासून मोठया राजनिष्ठेने आम्हांस सहाय्य करतील, अशी आमची पूर्ण उमेद आहे. ही आमची कारकीर्द दीर्घ कालपर्यंत चालवून सफल करावी, अशी मी त्या जगन्नियंत्या परमात्म्याची प्रार्थना करतो."[२९]

---

२८. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६०

२९. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.१८-१९

## अपत्ये :

१० मार्च १८९४ ला राधाबाई उर्फ आक्कासाहेब या शाहूंच्या पहिल्या अपत्याचा जन्म झाला. अऊबाई उर्फ आक्कासाहेब या शाहूंच्या दुसऱ्या अपत्याचा जन्म २३ मे १८९५ या दिवशी झाला. पण त्या बालपणातच मृत्यू पावल्या. शुक्रवार दि.३१ जूलै १८९७ या दिवशी युवराज राजाराम महाराजांचा जन्म झाला. शाहू छत्रपतींच्यानंतर यांनीच कोल्हापूरचा राज्यकारभार हाती घेतला होता. महाराजांचे चौथे व शेवटचे अपत्य म्हणजे राजकुमार शिवाजी. यांचा जन्म १५ एप्रिल १८९९ रोजी झाला.

## राज्यकन्येचा विवाह :

शाहू छत्रपतींच्या कन्या राधाबाई उर्फ आक्कासाहेब यांचा विवाह देवास संस्थानचे महाराज तुकोजीराव पवार यांच्याशी २१ मार्च १९०८ रोजी झाला. याच सुमारास १९०७ साली भोगावती नदीवर फिजिवडे येथे तलाव बांधण्याचे काम सुरू होते. राजकन्या राधाबाई यांच्या विवाहाचे स्मरण रहावे म्हणून या तलावाजवळ 'राधानगरी' हे गाव शाहूंनी वसविले. तलावाला महाराणी 'लक्ष्मीबाई' यांचे नाव देण्यात आले. सध्या हा तलाव 'लक्ष्मी तलाव' म्हणून ओळखला जातो.

## युवराजांचे शिक्षण :

युवराज राजाराम व राजकुमार शिवाजी हे आता प्रौढ होत चालल्यामुळे त्यांचे शिक्षण हा आता महाराजांच्यासाठी महत्त्वाचा प्रश्न बनला होता. महाराजांनी डॉ. आयर्विन व त्यांच्या पत्नी मिसेस आयर्विन यांना आपल्या मुलांचे शिक्षक म्हणून पसंत केले. डॉ. आयर्विन यांच्या अकाली मृत्यूनंतर मिसेस आयर्विन यांनीच राजकुमारांच्या शिक्षणाची जबाबदारी पार पाडली.

शिक्षणासाठी कुमारांना ११ मे १९१२ साली परदेशी इंग्लंडला पाठविण्यात आले. त्याठिकाणी राजकुमारांच्या राहण्याची, शिक्षणाची सर्व व्यवस्था मिसेस आयर्विन यांनीच केली होती. लंडनजवळील हेंडन येथील बर्नहॅम हाऊस या शाळेत राजकुमारांना प्रवेश देण्यात आला. त्यानंतर १९१४ सालच्या जानेवारीत युवराज ऑक्सफोर्ड येथील

सेंट एडवर्ड शाळेत दाखल झाले व राजकुमार शिवाजी ब्राम्सगूव्ह येथील 'किंग एडवर्ड' शाळेत दाखल झाले.[३०] येथील शिक्षणाच्या पूर्ततेनंतर १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाल्याने राजकुमार इंग्लंडहून न्यूयॉर्क, जपान, चीन, कोलंबो मार्गे भारतात आले. ९ डिसेंबर १९१५ ला शेतकी व तत्सम विषयांचे अध्ययन करण्यासाठी उभय राजपुत्रांना अलाहाबाद येथील 'युविंग ख्रिश्चन कॉलेज' मध्ये पाठविण्यात आले. कॉलेजमध्ये एकवर्ष काढल्यानंतर राज्यकारभाराचे व्यावहारिक ज्ञान मिळविण्यासाठी राजकुमार आपल्या राजधानीत परत आले.

## राजकुमारांचा विवाह :

शेतकी व तत्सदृश विषयांचे अधिक ज्ञान संपादन करण्यासाठी अलाहाबाद येथे एक वर्ष राहून १९१६ सालाच्या अखेरीस युवराज महाराज आपल्या बंधूसह कोल्हापूरला कायमचे परत आले.[३१] ते दोघे घरी परत आल्यानंतर त्यांचा विवाह करण्याचा निश्चिय महाराजांनी केला.

राजकुमार शिवाजी यांचा विवाह ६ जून १९१७ रोजी सासवडचे शंकरराव जगताप यांच्या कन्या जमुनाक्का यांच्याशी झाला. नववधूचे नाव 'इंदूमतीराणीसाहेब' असे ठेवण्यात आले. युवराज राजाराम महाराजांचा विवाह १ एप्रिल १९१८ रोजी बडोद्याचे महाराज 'सयाजीराव गायकवाड' यांची नात 'युवराज फत्तेसिंगराव यांची कन्या' इंदूमतीदेवी यांच्याशी झाला. नववधूचे नाव 'ताराबाई राणीसाहेब' असे ठेवण्यात आले.

१२ जून १९१८ रोजी राजकुमार शिवाजी हे कुंभोज टेकडीवर नेझ येथे डुकराची शिकार करत असताना घोडयावरून पडल्याने डोक्याला गंभीर इजा होऊन मृत्यू पावले. त्यामुळे आजन्म वैधत्वाची कुऱ्हाड इंदूमती राणीसाहेबांच्यावर कोसळली.

---

३०. लट्ठे आ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर, १९२५ पृ.क्र.३४५

३१. कित्ता - पृ.क्र.३७६

राजकुमार शिवाजी यांच्या मृत्यूनंतर महाराजांचे जीवनच बदलून गेले. त्यांनी राजवाडयातील राजैश्वर्याचा त्याग केला. ते अंतर्बाह्य विरागी बनून रजपूतवाडी कॅम्पमध्ये आश्रमी जीवन जगू लागले. ऐहिक जीवनातील सर्व रस आटून गेल्यासारखे ते विरक्त झाले. आता 'राहिलो उपकारापुरता' हीच भावना त्यांच्या ठिकाणी उत्तरोत्तर वाढत जाउन उर्वरित आयुष्य आता दलितपतितांच्या उद्धारासाठी खर्ची घालावे असा त्यांनी मनोनिग्रह केल्याचे जून १९१९ च्या मुंबईच्या गव्हर्नरास लिहिलेल्या पत्रांवरून दिसून येते. त्यामध्ये ते म्हणतात, "विशेषत: माझा मुलगा मृत्यू पावल्यापासून मला एक अनिवार इच्छा झाली आहे व ती म्हणजे गरीब वर्गाचे हित करण्याच्या दृष्टीने त्वरीत उपाय योजावेत ही होय. माझ्या लहान संस्थानामध्ये शक्यतो सर्व उपाय योजून मी तसे करण्याचा प्रयत्न करीत आहे. मला वाटते एक प्रकारची आत्मिक भावना मला हे मार्गदर्शन करीत आहे व गरिबांचे हित करण्यासाठी मला पुढे लोटीत आहे आणि हे कार्य करण्यास मी अंशत: जरी यशस्वी झालो तरी माझे जीवनकार्य सफल झाले असे मी मानीन."[३२]

**शाहूंचे कार्य :**

२ एप्रिल १८९४ च्या राज्यारोहण समारंभानंतर शाहू छत्रपतींचा राज्यकारभार सुरू झाला. राज्यकारभार करत असताना महाराजांसमोर अनेक अडचणी उभ्या होत्या. महाराज ब्रिटिशांचे मांडलिक असल्याने त्यांच्या कार्यावर बऱ्याचशा मर्यादा पडत होत्या. शिवाय प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणावर भरती केलेल्या ब्राम्हण व ब्रिटिश अधिकारी यांच्याकडूनही महाराजांना खूपच त्रास सहन करावा लागला.

अशा विविध प्रकारच्या अडचणींवर मात करून त्यांनी आपल्या २८ वर्षा च्या राजकीय कारकीर्दीत यशस्वी मार्गक्रमण केले. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, प्रशासकीय अशा विविध क्षेत्रांशी संबंधित अनेकविध कार्ये त्यांनी पार पाडली. या कार्याची नोंद पुढीलप्रमाणे घेता येईल...

---

३२. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, २००७, पृ.क्र.७६

## सामाजिक कार्य :

सामाजिक सुधारणेचे थोर पुरस्कर्ते म्हणून शाहू छत्रपती ओखळले जातात. पारंपारिक प्रथा, परंपरा, रूढी यांना छेद देऊन त्यांनी आपल्या संस्थानात अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. म्हणूनच कोल्हापूरचे सुविख्यात समाजोद्धारक म्हणून त्यांना ओळखले जाते.

'शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते होते. जाती-व्यवस्थेविरूद्ध त्यांनी प्रत्यक्ष कृतीने पुढाकार घेतला. सामाजिक प्रगतीला मर्यादा घालणाऱ्या रूढींना त्यांचा विरोध होता. महाराजांच्या अशा प्रगतीपर विचारातील सुधारणांनी कोल्हापूर संस्थानच्या इतिहासात आधुनिक युग सुरू झाले. महाराजांनी केलेल्या सामाजिक सुधारणा पुढच्या काळात समाजाला खुपच उपकारक ठरल्या.[३३]

शाहूंच्या सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांशी संबंधित केलेल्या कोणत्याही कृतीचा उद्देश हा समाजातील तळागाळातील, वर्णवर्चस्वाच्या नावाखाली दडपल्या गेलेल्या मागास वर्गांना न्याय मिळवून देण्याचा, त्यांना समाजातील इतर वर्गाच्या बरोबर आणण्याचा होता.

१. शाहूंच्या सामाजिक कार्याची दखल घेत असताना सर्वप्रथम उल्लेख करावा लागेल तो शाहूंच्या २६ जूलै १९०२ च्या जाहिरनाम्याचा ज्यामध्ये त्यांनी सरकारी नोकरीत शेकडा ५० जागा या सामाजातील मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवल्या होत्या.

    प्रशासनातील उच्चवर्णीयांच्या मक्तेदारीला आळा घालून हजारो वर्षा पासून वर्णवर्चस्वाच्या अमानवी परंपरेखाली भरडल्या गेलेल्या मागास जाती, जमातींना पुढे आणण्याचा, समाजात त्यांचा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न यामाध्यमातून त्यांनी केला.

---

३३. गर्गे स.मा. - करवीर रियासत, गो.य.राणे प्रकाशन, पुणे १९८०, पृ.क्र.६३९

२. सुतार, लोहार, कुंभार, शिंपी तेली इत्यादी जाती या हिंदू धर्मातील खालच्या जाती म्हणून ओळखल्या जात. या जातीमध्ये केला जाणारा एखादा धंदा वंशपरंपरेने त्या जातीतील लोकांना करावा लागत असे. त्यामुळे त्या विशिष्ट धंद्यावरून त्या संबधित व्यक्तीची जात ओळखली जात असे. इतर धंदा किंवा काम करण्याचे कौशल्य एखाद्या व्यक्तीत असूनही केवळ धर्मात असणाऱ्या जातीच्या, समाजव्यवस्थेच्या बंधनामुळे व्यक्तीला तो धंदा करता येत नसे. त्यामुळे २२ फेब्रुवारी १९१८ रोजी 'बलुते बंद'चा कायदा करून एकाच धंद्यात खितपत पडणाऱ्या समाजाची महाराजांनी त्यातून सुटका केली.

३. वंशपरंपरागत कुलकर्णी नेमणूक २९ जूलै १९१८ च्या कायद्याने रद्द करून त्याऐवजी पगारी तलाठी नेमण्याची पद्धती १९१९ पासून महाराजांनी सुरू केली. या तलाठयांच्या जागांवर मागासलेल्या वर्गातील विशेषत: अस्पृश्य वर्गातील, लोकांची वर्णी लागावी यासाठी 'तलाठी वर्ग' सुरू करून त्यात अस्पृश्य उमेदवारांना विशेष शिष्यवृत्या देऊन प्रशिक्षित केले गेले. अशा प्रशिक्षित अस्पृश्यांना अग्रक्रमाने तलाठी म्हणून नेमले जावे यासाठी महाराजांनी खास हुकुम जारी केला.[३४]

तसेच "ज्या जातीची लोकवस्ती जास्त असेल त्या जातीचे होता होईल तो तलाठी नेमावा. महार, मांग, चांभार वगैरे अस्पृश्य जातीच्या लोकांना होईल तितका प्रेफरन्स द्यावा. प्रत्येक पेट्यास ५ व प्रत्येक महालास निदान तीन तरी अस्पृश्य असावेत असाही आणखी एक हुकुम महाराजांनी काढला.[३५]

पिढ्यान्‌पिढ्या ज्या अस्पृश्य वर्गाला स्वत:ला उच्चभू म्हणवून घेणाऱ्या ब्राम्हण, मराठा वगैरे जातीतील लोकांना चावडीच्या बाहेर उभा राहून 'जोहार

---

३४. Sangave Vilas – Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol.-VIII (Impetus of social legislation and Non-Brahmin Movement) (1918 and 1919 A.D.), Shivaji University, Kolhapur 2001 Page No.- 187

३५. कित्ता - पृ.क्र.५६४

माय बाप' ही बिरूदावली म्हणावी लागे. त्या अस्पृश्य लोकांना महाराजांनी तलाठी नेमून समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. समाजात त्यांचा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न केला.

४. महार वतन असल्यामुळे गावात दवंडी देणे, मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावणे इत्यादी गलिच्छ कामे केवळ महार असल्यामुळे या जातीतील लोकांना करावी लागत. महाराजांनी हे ओळखले आणि १९१९ च्या वटहुकुमाद्वारे 'महार वतन' कायद्याने रद्द करून या अमानवी गुलामगिरीतून त्यांनी महारांची मुक्तता केली.

५. ७ जून १९२० च्या राजाज्ञेप्रमाणे शाहूंनी महारांना गुलामगिरीतून पूर्णपणे मुक्त केले. त्यांना मानवी हक्क संपूर्णपणे देऊन आपल्या राज्यात सक्तीची वेठबिगारी बंद केली.

६. 'अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मांग, बेरड, रामोशी या लोकांना चोर, दरोडेखोर असा शिक्का कायम पिढ्यान्‌पिढ्यावर पडलेला असल्यामुळे त्यांच्यामध्ये एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झालेला होता. त्यांना चावडीत दररोज हजेरी द्यावी लागे. त्यामुळे १९१८ ला गुन्हेगार जातीच्या लोकांची हजेरी पद्धत बंद करावी म्हणून शाहूंनी राजाज्ञा काढली.

याशिवाय सामाजिक सुधारणांचे कार्य करत त्यांनी जुलै १९१७ साली 'विधवा-पुनर्विवाह' कायदा केला. जानेवारी १९२० च्या कायद्याने जोगती , देवदासी प्रथेचे निर्मुलन करण्याचा प्रयत्न केला. तसेच ८ ऑक्टोंबर १९१९ साली संस्थानातील सर्व सरकारी व सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांना खुली करून सार्वजनिक ठिकाणी कोणीही अस्पृश्यता पाळू नये असा कायदा केला. या कायद्याच्या आंमलबजावणीसाठी खास तरतूदी केल्या आणि त्याचे उल्लंघन करणाऱ्यास शिक्षाही देण्यात येत असे.

वरील विविध सुधारणांच्याबरोबर छत्रपती शाहूंनी प्रत्यक्ष कृतीतून वैयक्तिक जीवनातील अनेक उदाहरणे लोकांसमोर ठेवून अस्पृश्यता निवारणाचा व सामाजिक समतेचा दृष्टीकोन लोकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. जसे अविश्वासू,

गुन्हेगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फासेपारधी लोकांना अंगरक्षक, पहारेकरी अशा विविध जागांवर, पदावर नेमून त्यांच्यासंदर्भातील विश्वासार्हता लोकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. गंगाराम कांबळेसारख्या अस्पृश्य व्यक्तीला हॉटेल काढून देऊन महाराज त्याठिकाणी स्वत: चहा पित असतं. अस्पृश्य समाजातील लोकांची आडनावे बऱ्याचदा जातिवाचक असत त्यामुळे त्यांच्या आडनावावरून त्यांच्या जातीचा लगेच बोध होत असे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी अस्पृश्यांना अडचणी निर्माण होत. यासाठी महाराजांनी त्यांच्या आडनावात बदल केले.

याशिवाय जातीभेदाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आंतरजातीय विवाह घडवून आणण्यासाठी महाराजांनी स्वत: पुढाकार घेतला होता. त्यासाठी त्यांनी कागल जनक घराण्यातील आपले चुलते काकासाहेब घाटगे यांच्या कन्या चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकर यांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी केला. इंदूरचे महाराज होळकर धनगर व कागलचे घाटगे क्षत्रिय मराठा हा आंतरजातीय विवाह घडवून आणण्याचे धाडस महाराजांनी केलं.'आधी केले मग सांगितले' या उक्तीचा प्रत्यय शाहूंच्या या कार्याच्या माध्यमातून दिसून येतो.

सुमारे १०० वर्षापूर्वी कोल्हापूर संस्थानात सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून महाराजांनी आपल्या संस्थानात जे चित्र निर्माण केले ते किती क्रांतीकारक दिसत असेल याची आपण आज कल्पनाच करू शकत नाही. हे बदल म्हणजे केवळ सामाजिक सुधारणा, बदल नव्हता तर ती सामाजिक क्रांतीच होती. या सामाजिक कार्यापाठीमागील उद्देश इतकाच होता की समाजातील जातीभेद नष्ट व्हावे.विशिष्ट जातीत किंवा धर्मात जन्म घेतला म्हणून तो उच्च कुळातला असे नाही तर व्यक्ती तिच्या अंगभूत गुणाने, कौशल्याने मोठेपण प्राप्त करू शकतो हे महाराजांना दाखवून द्यावयाचे होते. म्हणूनच महाराजांनी व्यक्तीची जात धर्म यांचा विचार न करता प्रत्येकास योग्य संधी दिली त्यामाध्यमातून त्यांचा उत्कर्ष साधण्याचा प्रयत्न केला.

## शैक्षणिक कार्य :

शिक्षणाअभावी बहुजन समाजाची झालेली दयनीय अवस्था व वाताहत पाहून महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार व शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हजारो वर्षापासून ब्राम्हणी व्यवस्थेने ब्राम्हण सोडून इतरांना शिक्षणाचा अधिकार नाकारला. त्यामुळे बहुजन समाज अज्ञानाच्या अंध:कारात पुरता बुडाला. त्यांना या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी महाराजांनी हे ठोस पावले उचलले.

त्यासाठीच महाराजारांनी सर्व खेड्यापाड्यातून प्राथमिक शाळा काढल्या. सक्तीच्या सार्वत्रिक व मोफत शिक्षणांबरोबरच अनेक जाती जमातीसाठी वसतिगृहे स्थापन केली.

महाराजांनी हे जाणले होते की, गरजू, गरीब, दलित व मागासलेल्या अशा सामान्य जनतेची मूले हायस्कूल व कॉलेज शिक्षणाची इच्छा करतात पण त्यांच्या जेवणाची व राहण्याची सोय नव्हती. खेड्यापाड्यातील अनेक बुद्धीमान मुले या गैरसोयीमुळे घरी बसत. त्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेला व प्रगतीला या अडचणीमुळे खीळ बसे. तेव्हा महाराजांनी हि गैरसोय लक्षात घेऊन सन १८९६-९७ च्या अहवालात जितक्या जाती-जमाती असतील त्यांच्यासाठी वसतिगृह काढण्याची धाडसी महत्त्वाकांक्षी योजना जाहिर केली.[३६]

या महत्त्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ त्यांनी १० ऑगस्ट १९०० साली 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग'च्या स्थापनेने केला. सुरूवातीला सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्या साठी एकच वसतिगृह महाराजांनी सुरू केले होते. परंतु विद्यार्थ्यांच्यामध्ये असणाऱ्या जाती भिन्नतेमुळे उच्च जातीतील मुले अस्पृश्य मुलांकडे तुच्छतेने पाहत. त्यांच्या वेगळ्या पंक्ती होत असत. अस्पृश्यां-अस्पृश्यांमध्ये देखील उच्च नीचतेची भावना होती.

---

३६. नाईक तु.बा.- छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.७६

त्यामुळे महार, मांग, चांभार ढोर, शिंपी, सुतार अशा विविध जाती धर्माच्या विद्यार्थ्यांच्यासाठी एकूण २१ वसतिगृहे महाराजांनी सुरू केली.[३७]

शिक्षण ही सर्व सुधारणांची गुरू किल्ली आहे. बहुजन समाजाचा उद्धार करावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे महाराजांनी ओळखले व ८ सप्टेंबर १९१७ ला सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा आपल्या संस्थानात केला. त्यांनी सर्व खेड्यापाड्यात प्राथमिक शाळा स्थापन केल्या.

तसेच उद्योगधंद्याचे शिक्षण देण्यासाठी टेक्निकल स्कूल (१९0३), पाटलांना सरकारी कामात हुशार करण्यासाठी गावकामगार पाटील स्कूल (१९११), तलाठ्याचे शिक्षण देण्यासाठी तलाठी स्कूल (१९१९), चारिज्यसंपन्न नागरिक तयार व्हावा या उद्देशाने तपोवन आश्रम व विद्यापीठ हायस्कूल याशिवाय छत्रपती संस्कृत विद्यालय, शिवाजी वैदिक विद्यालय यासारख्या शैक्षणिक संस्था महाराजांनी आपल्या संस्थानात स्थापन केल्या होत्या.

याशिवाय महाराजांनी कोल्हापूर बाहेर १.सन १९२० साली पुणे येथे 'ताराबाई वसतिगृह' व २.अहमदनगर येथे 'चौथे शिवाजी महाराज विद्यार्थी वसतिगृह', ३.नाशिक येथे 'उदोजी विद्यार्थी वसतिगृह व वंजारी समाज विद्यार्थी वसतिगृह या संस्था स्थापन करण्यासाठी हातभार लावला होता.[३८]

छत्रपती शाहूंनी सुरू केलेल्या चळवळीने आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी शेकडो कर्तबगार व्यक्ती उदयास आल्या.

कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराजांच्या वसतिगृह चळवळीचेच अपत्य होते. त्यांनी 'रयत शिक्षणसंस्था स्थापून महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात ज्ञानाची गंगा तर नेलीच, पण ठिकठिकाणी हायस्कूल कॉलेज सोबत गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे स्थापन

---

३७. साळुंखे हिंदूराव - छत्रपती शाहू स्मृतिदर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भंडार, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, जून १९९८, पृ.क्र.१९८

३८. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.७९

स्थापन केली. या विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका' हा स्वावलंबी जीवनाचा मंत्र देऊन कर्म वीरांनी आपल्या गुरूंच्याही पुढे एक पाऊल टाकले.[३९]

**आर्थिक कार्य :**

छत्रपती शाहू महाराजांनी शेती, व्यापार, उद्योगधंदे, सहकार या माध्यमातून संस्थानाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला.

सातव्या एडवर्डच्या राज्यारोहण समारंभासाठी १९०२ साली महाराज इंग्लंडला गेले. त्याठिकाणी असणारी प्रचंड धरणे, शेती सुधारणा व उद्योगधंदे यामुळे महाराज खूपच प्रभावित झाले होते. राज्याचा विकास करावयाचा असेल तर सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून विचार करावा लागेल हे सत्य त्यांनी जाणले. यामुळे तिथून परत आल्यानंतर आपल्या इकडील शेतकऱ्यांनीही शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा यासाठी प्रोत्साहन दिले.

या उद्देशाने महाराजांनी १९१२ साली 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टियुट' या संस्थेची स्थापना केली. 'शेतकऱ्यांना सुधारित अवजारे, बी-बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पद्धती यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास शेती अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आल्या. रथोत्सव, यात्रा अशा प्रसंगी लोकांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी 'शेती प्रदर्शन' भरवले जाई. आपल्या प्रजेत विज्ञानाची आवड निर्माण व्हावी. या उद्देशाने महाराज विज्ञान प्रदशने ही आयोजित करीत. या प्रदर्शनाकडे राज्यातील जनता आणि विशेष करून शेतकरी वर्ग मोठया संख्येने आकर्षित व्हावा या उद्देशाने कुस्त्या, करमणूकीचे कार्यक्रम, हत्तींच्या झुंजी यासारखे कार्यक्रम आयोजित केले जात असत.[४०] शेतीतील नव-नवीन प्रयोगांचीही शाहूंना आवड होती. त्यामुळे त्यांनी संस्थानच्या पश्चिम भागात मुबलक पाऊस असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगात उतार जमिनीवर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडीचे प्रयोग यशस्वी

३९. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.७१

४०. कित्ता - पृष्ठ क्र. २०३

करून दाखविले होते. याशिवाय शेतकऱ्यांचे दारिद्र्य नष्ट करून अधिक उत्पादन वाढीच्या उद्देश्याने महाराजांनी शेती सुधारणा व शेती पाणी पुरवठयासाठी १९०७ साली 'लक्ष्मी तलावा'चा पाया घातला.

लक्ष्मी तलावाची योजना ही प्रचंड तसेच दरबारच्या आवाक्याबाहेरची आहे असा ५ सप्टेंबर १९०६ चा तज्ञांचा अहवाल असूनही हि योजनाच आपल्या राज्याला दुष्काळमुक्त करील अशी खात्री महाराजांना असल्यामुळेच त्यांनी हि योजना हाती घेण्याचे धाडस केले. खुद्द महाराजांनी या प्रकल्पास आपले जीवितकार्य समजले होते. आपल्या एका स्नेहास लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले होते, "My life's work will have been done when I complete this project!" [४१]

मराठी माणसांनी व्यापार-उद्योगात शिरावे आणि आपल्या बरोबर देशाचीही प्रगती करावी असे महाराजांना वाटे. यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात व्यापार उद्योगधंदे यांच्या वाढीसाठी प्रोत्साहन दिले.

कोल्हापूरचा गूळ हा चांगला दर्जेदार असतो. तेव्हा गुळाचा व्यापार वाढावा व बाहेरचा पैसा इकडे यावा. शेतकऱ्यांचे कल्याण व्हावे या उद्देश्याने महाराजांनी रेल्वे स्टेशननजीक १८९५ ला 'शाहूपूरी' व्यापार पेठेची स्थापना केली. [४२] आज ही व्यापारपेठ कोल्हापूर जिल्ह्याचा आर्थिक कणाच बनली आहे. शाहूपूरी व्यापार पेठेचे मार्केटयार्डात रूपांतर झाले असून त्याला 'शाहू मार्केट यार्ड'असे मानाभिधान प्राप्त झाले आहे. याशिवाय १९१७ साली छत्रपती शाहूंनी आणखी एक बाजारपेठ वसविली या बाजारपेठला आपल्या जनक वडिलांच्या जयसिंगराव घाटगे यांच्या नावावरून 'जयसिंगपूर' हे नाव दिले. [४३]

| | | |
|---|---|---|
| ४१. कित्ता | - | पृष्ठ क्र. २०२ |
| ४२. नाईक तु.बा. | - | छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१०४ |
| ४३. Sangave Vilas. | – | Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol.-VII (Implimation of socio-political scheme) (1916-1919), Shivaji University, Kolhapur 1997 Page No.- 43. (Introduction) |

उद्योगधंद्यांच्या वाढीला प्रोत्साहन देत असताना १९०६ साली महाराजांनी 'दि शाहू छत्रपती स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल' या गिरणीचा पाया घातला.[४४] या गिरणीच्या स्थापनेमुळे कोल्हापूरातील शेकडो लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

याच सुमारास शिरोळ रोड येथे जिनिंग फॅक्टरीसाठी महाराजांनी मदत दिली होती. त्यानंतर इचलकरंजी, गडहिंग्लज इत्यादी ठिकाणी अनेक जिनिंग फॅक्टरी स्थापन झाल्या होत्या. '१९१२-१३ च्या सुमारास संस्थानातील पहिली 'ऑईल मिल, पहिली सॉ मिल फॅक्टरी, पहिली इलेक्ट्रिक कपंनी, पहिली मोटार ट्रान्सपोर्ट कपंनी असे अनेक उद्योग सुरू झाले. निरनिराळ्या उद्योगांसाठी प्रशिक्षित कामगार तयार व्हावेत म्हणून 'राजाराम इंडस्ट्रियल स्कूल' स्थापन करण्यात आले होते.[४५] महाराज पुण्याच्या स्वदेशी कागद गिरणीचे आश्रयदाते होते.

महाराजांनी बाजारपेठा स्थापन करत असताना अनेक व्यापार उद्योजकांना सवलती दिल्या होत्या. त्यांना प्रसंगी अल्पमुदतीची कर्जे देण्याची व्यवस्था केली होती. खालच्या वर्गातील काही उत्साही तरूणांना भांडवल देऊन पेठेत दुकाने काढून दिली. महाराजांचे दोन्ही राजकुमार युवराज राजाराम महाराज व युवराज शिवाजी महाराज या दोघोंचेही उद्योग, शेती, व्यापार इकडे लक्ष होते. आर.बी.एन.नावाचे अडत दुकान थोरल्यांना व एस.ए.बी. ही स्टेशनरी कंपनी धाकटया युवराजांना काढून दिली होती."[४६]

सुगंधी औषधी तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, काष्ठार्क उद्योग यासारखे जंगल संपत्तीवर आधारित काही उद्योग सुरू करण्यास महाराजांनी आपल्या संस्थानात प्रोत्साहन दिल्याचे उदाहरणे सापडतात.

४४. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१०५
४५. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी,कोल्हापूर २००७, पृ.क्र.२०७
४६. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१०६

महाराजांनी गुजरात, राजस्थानमधील तसेच निपाणी, बेळगाव इत्यादी भागातील व्यापारी लोकांना शाहूपूरी व्यापारपेठत आश्रय देऊन स्थायिक होण्यास उत्तेजन दिले होते. तसेच संस्थानाबाहेरच्या अनेक व्यापार उद्योगजकांनाही व्यापारासाठी मदत केल्याची उदाहरणे आहेत. यामध्ये मुंबई सरदारगृहाचे मालक विश्वनाथ साळवेकर व किर्लोस्कर कारखान्याचे संस्थापक लक्ष्मणराव किर्लोस्कर याचा समावेश होतो.

सहकारी तत्वास चालना देण्याचे कामही शाहू छत्रपतींनी केले. त्यासाठी १९१२ साली आपल्या राज्यात 'सहकारी संस्थाविषयक कायदा' समंत करून त्याला कायद्याचे स्वरूप दिले. 'सहकारी संस्थांची कायदेशीर नोंदणी करण्यासाठी 'सहकार निबंधकाची' नेमणूक करण्यात आली. दुसऱ्याच वर्षी म्हणजे १९१३ साली कोल्हापूरात 'दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.' ही पहिली सहकारी संस्था भास्करराव जाधवांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली होती. १९२१ सालापर्यत संस्थानातील सहकारी संस्थांची संख्या ३७ पर्यत पोहचली होती.[४७]

अशाप्रकारे शेती, व्यापार, सहकार यामाध्यमातून संस्थानच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न छत्रपती शाहूंनी केला. राजर्षी छत्रपती शाहूंनी आर्थिक उन्नतीसाठी शाहू मिलची स्थापना, शेती व औद्योगिक विकासासाठी पाणीपुरवठा व वीजनिर्मिती करणारे राधानगरी धरण, शेती प्रदर्शने आदी कल्पना त्यांच्या विचारातील पुरोगामित्व सिद्ध करतात. छत्रपती शाहूंनी कोल्हापूर राज्यातील समाज समृद्ध व्हावा यासाठी निर्धाराने पाऊले टाकली. नव्या ज्ञानावर, तंत्रज्ञानावर, नव्या साधनांवर आधारित ज्ञानाचा स्वीकार करावा अशी प्रेरणा ते सर्वांना देत होते.

### प्रशासकीय कार्य :

छत्रपती शाहूंच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक कार्याइतकेच प्रशासकीय कार्यही महत्त्वाचे मानले जाते. १८९४च्या राज्यारोहण समारंभानंतर छत्रपती शाहूंनी जेव्हा

---

४७. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.२०९

प्रत्यक्ष राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. तेव्हा प्रशासनात युरोपियन, ब्राम्हण, पारशी यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. मराठ्यांना या प्रशासनात कुठेच स्थान नव्हतं. बहुजन समाजातील एकही व्यक्ती प्रशासनात अधिकारपदावर नव्हती.

१८४४ ते १८९४ या पन्नास वर्षाच्या काळात कोल्हापूरच्या गादीवरचे छत्रपती अल्पवयीन असल्यामुळे संस्थानचा कारभार त्यांच्यावतीने कारभारी, दिवाण किंवा राजमंडळ (रिजन्सी कौन्सिल) ब्रिटिश रेसिडेंटच्या देखरेखेखाली चालवत असे.

प्रत्यक्ष छत्रपतीच्या नियंत्रणाखाली कारभार नसल्याने प्रशासनात अकार्यक्षमता, गोंधळ वाढून कामचुकारपणा, फसवेगिरी, भ्रष्टाचाराचा जोर चढला होता. प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी बेपर्वा, उद्दाम, बेजबाबदारपणे वागत होते. राज्यारोहण समारंभानंतर जेव्हा प्रत्यक्ष शाहू छत्रपतींच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे आली तेव्हा हे प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी या राजवटीचा द्वेष करू लागले ते छत्रपतींच्या आज्ञेवरून तात्काळ वर्तन करत नसत.

त्यामुळे हा अनागोंदी कारभार नियंत्रित करण्यासाठी आणि प्रशासनातील ब्राम्हणांच्या मक्तेदारीला आळा घालण्यासाठी शाहूंनी प्रशासकीय सुधारणा केल्या. समाजातील प्रत्येक घटकाला आपला न्याय्य वाटा मिळावा अशी शाहूंची इच्छा असल्याने त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या प्रशासनात त्याच्या पात्रतेनुसार स्थान दिले. एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी विशिष्ट पात्रता नसल्यास ती प्राप्त करण्यासाठी शाहू त्या व्यक्तीला मदत करीत.

उच्च अधिकारपदांवरची ब्रिटिश, पारशी आणि ब्राम्हणांची मक्तेदारी मोडून त्यांच्या जागी योग्य अशा गुणी मराठा, कायस्थ, जैन, लिंगायत इत्यादींच्या नेमणूका करण्यास शाहू छत्रपतींनी सुरूवात केली. ही निवड करताना केवळ मराठा, लिंगायत अशा विशिष्ट जातीत जन्म या एकाच निकषावर कोणत्याही माणसाची छत्रपती शाहूंनी कधीच निवड केली नाही. नेमणूक करताना गुणवत्तेचा विचार आधी केला जात असे.

त्यांनी प्रशासनात ब्राम्हणेत्तरांच्या नेमणूका करण्यास सुरूवात केली. १९०२ साली प्रशासनात 'सरकारी' नोकरीत शेकडा ५० जागा या समाजातील मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. पारंपारिक कुलकर्णी वतने, रद्द करून १९१९ पासून पगारी तलाठी नेमण्याची पद्धती सुरू केली. या तलाठ्यांच्या जागांवर मागासलेल्या वर्गातील, विशेषत: अस्पृश्यवर्गातील, लोकांची वर्णी लागावी यासाठी 'तलाठी वर्ग' सुरू करून त्यात अस्पृश्य उमेदवारांना विशेष शिष्यवृत्त्या देऊन प्रशिक्षित केले गेले.

'प्रशासनामधून भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि जातीयवादी तत्वे भिरकावून देण्यासाठी शाहूंनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. जी माणसे प्रशासनात आपल्याकडे असणाऱ्या हुद्याच्या, अधिकाराच्या जोरावर लोकांना लुबाडत होती अशा मंडळी विरूद्ध शाहू उभे राहिले.

कर्तृत्वान अशा प्रशासकाचा संघ तयार करण्यासाठी महाराजांनी एम.ए. ची पदवी घेतलेल्या भास्कर विठोबा जाधव यांची सहाय्यक सरसुभे म्हणून नेमणूक केली. मिस लिटल यांनी स्त्री अधिक्षक पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या जागी रखमाबाई केळवकर यांची २८ सप्टेंबर १८९५ रोजी नेमणूक करण्यात आली. संस्थानचा कार्यकारी अभियंता आर.जे. शॅनॉन याने राजीनामा दिल्यानंतर त्याच्या जागी दाजीराव अमृतराव विचारे यांची नेमणूक करण्यात आली.

त्यांनी प्रशासनातील कर्मचाऱ्यामध्ये शिस्तीचे पालन करण्यासाठी अनेक कायदे संमत केले. कर्मचाऱ्यांकरीता त्यांच्या आगमन आणि जाण्याचा वेळी, त्यांची पदोन्नती, बदली, रजा, प्रशासकीय भाषा याकरिता तरतूदी केल्या. प्रशासकीय सुधारणा करताना समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा समाजातील मागासलेल्या घटकाला समाजातील प्रगत घटकाच्या बरोबर आणण्याचा त्यांचा उद्देश होता.

**पदव्या :**

महाराजांनी त्यांच्या कारकीर्दीत केलेल्या उत्कृष्ट कार्याचा गौरव म्हणून त्यांना पुढील पदव्या बहाल करण्यात आल्या होत्या.

१. कोल्हापूरात बाहेर ज्या-ज्या सार्वजनिक चळवळी होत जेव्हा जेव्हा एखाद्या चळवळीच्या पुरस्कर्त्याचा स्वार्थत्याग महाराजांच्या दृष्टीपतीस येई तेव्हा तेव्हा महाराज अशा चळवळीस पराकाष्ठाचे दातृत्व दाखवित असत. महाराजांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल १ जानेवारी १८९५ रोजी सम्राज्ञी व्हिक्टोरिया कडून महाराजांना 'जी.सी.एस.आय.' हा किताब बहाल करण्यात आला.[४८]

२. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतही महाराज जे उत्कृष्ट कार्य करीत होते त्याचे महत्त्व मुंबई सरकार जाणून होते. या कार्याचे महत्त्व जाणूनच सम्राज्ञी व्हिक्टोरिया राणीसाहेब यांनी आपल्या ८१ व्या (२४ मे १९०० रोजी) वाढदिवसानिमित्त 'महाराज' ही पदवी कोल्हापूरच्या छत्रपतींना वंशपरंपरा धारण करण्याचा अधिकार दिला.[४९] तत्पूर्वी १८१२ मध्ये ब्रिटिशांशी झालेल्या तहान्वये कोल्हापूरचे स्वातंत्र्य नष्ट होऊन कोल्हापूर हे मांडलिक राज्य बनले आणि ब्रिटिश लोक महाराजाला 'राजा' असे संबोधू लागले होते.

३. सातव्या एडवर्डच्या राज्यारोहण समारंभाला उपस्थित राहण्यासाठी २ जून १९०२ ला महाराज आपल्या परिवारासह लंडनला गेले. महाराजांनी शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव म्हणून 'केंब्रीज विश्वविद्यालयाने महाराजांना १० जून १९०२ ला एल.एल.डी. ही बहुमानाची पदवी दिली. तसेच इंग्लंडच्या रॉयल ॲग्रिकल्चरल सोसायटीच्या साधारण सभेला महाराज हजर होते. या सोसायटीचे प्रसिडेंट प्रिन्स खिश्चन यांनी एम.आर.ए.एस. ही पदवी देऊन महाराजांना विभूषित केले होते.[५०]

---

४८. लट्ठे आ.बा.- श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र,बा.ल.पाटील,कोल्हापूर,१९२५ पृ.क्र.९८
४९. कित्ता - पृष्ठ क्र.१७०
५०. कित्ता - पृष्ठ क्र.१९४ - १९५

४. लॉर्ड कर्झनचा दिल्ली दरबार १९0३ सालच्या वर्षारंभीच्या (१ जानेवारी) दिवशी भरला. महाराज या दरबारला हजर होते. बादशहाच्या अनुज्ञेने नेक नामदार डयुक ऑफ कॅनॉट यांनी महाराजांना (९ जानेवारी १९0३) ला जी.सी.व्ही.ओ. ही बहुमानाची पदवी दिली.[५१]

५. पंचम जॉर्जच्या सन्मानप्रीत्यर्थ १९११ साली दिल्ली येथे मोठा बादशाही दरबार भरविण्यात आला होता. या दिल्ली दरबारासाठी ३0 नोव्हेंबर १९११ ला महाराज दिल्लीत दाखल झाले. दिल्लीला बादशाही दरबारासंबंधी जे विविध कार्यक्रम घेण्यात आले. या सर्व प्रसंगांना महाराज हजर राहिले होते. त्यावेळी जॉर्ज बादशहाने (१२ डिसेंबर १९११) ला जी.सी.आय.ई. ही बहुमानाची पदवी महाराजांना बहाल केली.[५२]

६. १९१९ साली उत्तरप्रदेशातील कानपूर शहरात दिनांक १९ ते २१ एप्रिल असे तीन दिवस अखिल भारतीय कुर्मी क्षत्रियांची परिषद भरली होती. छत्रपती शाहू महाराजांनी परिषदेचे अध्यक्षस्थान विभूषित केले होते. पहिल्या दिवशी अध्यक्षीय भाषण करून महाराज निघून गेले. महाराजांच्या भाषणाने जमलेले लोक एवढे प्रभावित झाले की शेवटच्या दिवशी महाराजांना 'राजर्षी' ही पदवी बहाल करण्याचा ठराव या परिषदेत सर्वानुमते मंजूर झाला.[५३]

## निधन :

महाराजांची प्रचंड शरीरयष्टी, शारिरीक व बौद्धिक कार्यक्षमता पाहून वयाच्या ४८ व्या वर्षी महाराजांचा मृत्यू होईल असे वाटत नव्हते. १८९४ च्या राज्यारोहणानंतर शाहूंचा राज्यकारभार सुरू झाला तरी इतर हिंदी संस्थानिकांप्रमाणे त्यांचा मार्ग सुलभ, सुखकर नव्हता. प्रसंगी महाराजांना प्रवाहाच्या विरोधात जाऊन आपले कार्य

---

५१. कित्ता - पृष्ठ क्र.१८७
५२. कित्ता - पृष्ठ क्र.३१४
५३. साळुंखे पी.बी.- राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, १९७६, पृष्ठ क्र.२१ (चार शब्द)

करावे लागत असे. समाजात पूर्वापार चालत आलेल्या सामाजिक रूढी, प्रथा, परंपरा यांना छेद देऊन त्यांना राज्यकारभार करावा लागत होता. महाराजांच्या कामाचा व्याप इतका मोठा होता की, या कामाच्या व्यापामुळे त्यांच्या जीवनात अनेक प्रकारचा अनियमितपणा निर्माण झाला होता.

कामाचा व्याप सोडून किंवा बाजूला ठेवून शरीर स्वाथ्याकडे लक्ष देणे शक्य नसल्याने तसेच अगदीच नाइलाज झाल्याखेरीज डॉक्टरांचे म्हणणे न ऐकण्याच्या त्यांच्या सवयीमुळे रोगांनी महाराजांच्या शरीरात बिघाड करण्यास सुरूवात केली.

१९१0 च्या सुमारास बहुसुत्रता व काळजाची नि:शक्तता हे विकार महाराजांना जडले. त्यावेळी विश्रांती घ्यावी व जर्मनीत जाऊन स्नानाचे उपचार घेण्याचा सल्ला महाराजांना डॉक्टरांनी दिला पण कार्यव्यापृतीमुळे महाराजांना ते शक्य झाले नाही.

आपल्या राज्यकारभारास दुसऱ्यावर सोपवून शरीर स्वास्थ्यासाठी परदेशात जाणारे अनेक संस्थानिक होते. असाच एखादा उपाय करून महाराजांना आपले जीवन निदान शतवार्षिक करणे सहज शक्य झाले असते. परंतु त्याच्या स्वभावाने त्यांना हा मार्ग कधीच स्वीकारू दिला नाही.

ते आपल्या प्रकृतीवर स्वत:च प्रयोग करू लागले. उपास-तापास, भर उन्हात हिंडणे, पावसात अगर थंडीत जंगलात मुक्काम करणे अशा महाराजांच्या कायम सवयी होत्या. अशाने आपली प्रकृती सुधारत आहे असे त्यांना वाटे.[५४] एकामागून एक रोग त्यांच्या शरीरात वाढतच गेले. तथापि त्यामानाने जरूर ते उपाय महाराज करीत होतेच असे नाही.

महाराज राज्यकारभार पाहून आपला बराचसा वेळ शिकारीमध्ये व्यथित करत असत. त्यामुळे काही लोक महाराजांची गणना विक्षिप्त, आळशी लोकांत करत

---

५४. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१०८



15232

परंतु या शिकारी पाठीमागचा महाराजांचा मुख्य उद्देश आपल्या संस्थानातील गरीब रयतेची प्रत्यक्ष माहिती करून घेण्याचा असे. या माध्यमातून त्यांना आपल्या संस्थानच्या परिस्थितीची कल्पना येत असे.

महाराजांच्या तत्कालिन पत्रव्यवहारावरून असे लक्षात येते की, १९१९ पासून आपले आयुष्य आता फार नाही असे महाराजांना वाटू लागले होते. त्यांच्या छातीचा विकार वाढतच गेला. शरीर सर्व बाजूंनी जर्जर कमकुवत बनत गेले. रोगांनी महाराजांच्या शरीरात थैमान घातले होते आणि शरीर स्वास्थ्यासाठी विश्रांती घेणे त्यांच्या स्वभाव धर्मास अनुरूप नसल्याने छातीचा विकार वाढतच जाऊन ६ मे १९२२ रोजी सकाळी ६ वाजता वयाच्या ४८ व्या वर्षी मुंबईतील खेतवाडीतील 'पन्हाळा लॉज' बंगल्यात महाराजांचे निधन झाले.

६ मे च्या मध्यरात्री शाहूंचे शव कोल्हापूरात पोहचले. ७ मे १९२२ च्या पहाटे ५.३० वाजता शिवाजी वैदिक विद्यालयाच्या मराठा विद्यार्थ्यांनी वैदिक मंत्रांनी महाराजांच्या देहाचे अंत्यविधी केले. शाहूंना अखेरची ४८ तोफांची सलामी देण्यात आली होती.

पूर्वापार चालत आलेल्या धार्मिक परंपरेनुसार ब्राम्हण पुरोहिताकडून शाहूंचे अंत्यसंस्कार न करता, शिवाजी वैदिक विद्यालयाच्या मराठा विद्यार्थ्यांकडून शाहूंचे अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय छत्रपती राजाराम व महाराणी लक्ष्मीबाईसाहेब यांनी घेतला. हा क्रांतीकारक, रूढीभंजक निर्णय घेऊन राजाराम छत्रपती व महाराणी लक्ष्मी बाईसाहेब यांनी जणू शाहूंच्या तत्त्वप्रणालीशी इमान राखले होते.[५५] निष्ठा व्यक्त केली होती.

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य पाहिले असता त्याचे प्रगमनशील विचार, दर्शविलेला द्रष्टेपणा समाजाला सक्षम करून प्रगतीपथावर खंबीरपणे पाऊले टाकण्यास

---

५५. सुर्यवंशी कृ. गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.६५३

शिकविण्यासाठी केलेले प्रयत्न, त्यासाठी उपयोगात आणलेली स्वत:ची तसेच जनसामान्यांची कार्यक्षमता पाहिली असता छत्रपती शाहूंच्या कार्याची खोली लक्षात येते. तसेच राजर्षी छत्रपती शाहूंच्या जीवनकार्याचा आढावा घेतला असता छत्रपती शाहू महाराज हा एकत्र सृजनशील, मानवतावादी क्रांतीप्रवण राजा होता असे लक्षात येते.

## संदर्भ सूची :


| | | |
|---|---|---|
| १. कीर धनंजय | - | राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.३ |
| २. कित्ता | | |
| ३. कित्ता | | |
| ४. कित्ता | - | पृ. क्र.५ |
| ५. गर्गे स.मा. | - | करवीर रियासत, जो.ये.राणे प्रकाशन, पुणे, जुन १९८०,पृ.क्र.५७१ |
| ६. कीर धनंजय | - | राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.८ |
| ७. कित्ता | - | पृ.क्र.१६ |
| ८. लट्ठे आ.बा. | - | श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर, १९२५ पृ. क्र. २८ |
| ९. कीर धनंजय | - | राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.१९ |
| १०. लट्ठे अ.बा. | - | श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर, १९२५ पृ.क्र.३८ |
| ११. कीर धनंजय | - | राजर्षी शाहू छत्रपती एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.२१ |
| १२. कित्ता | - | पृ.क्र.३६ |
| १३. पवार जयसिंगराव | - | राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर,२००७, पृ.क्र.२१ |
| १४. कीर धनंजय | - | राजर्षी शाहू छत्रपती एक समाज कांतीकारक राजा,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,२००१, पृ.क्र.३५ |
| १५. जाधव रमेश | - | लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे, ऑगस्ट १९९७, पृ.क्र.८६-८७ |
| १६. सुर्यवंशी कृ. गो. | - | राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क.२६ |
| १७. जाधव भ.बा. | - | राजर्षी शाहू महाराजांची भाषणे, राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९७१, पृ.क्र. ५-६ |
| १८.कित्ता | - | पृ.क्र. ६९ |
| १९. सुर्यवंशी कृ.गो. | - | राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क्र.३५ |

२०. कित्ता - पृ.क्र. ३६-३७

२१. कित्ता - पृ.क्र. ४१

२२. लट्ठे आ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर,१९२५ पृ.क्र.७२

२३. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८४ पृ.क्र.५८

२४. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.३१

२५. लट्ठे आ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर, १९२५ पृ.क्र.२०५

२६. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.३३-३४

२७. लट्ठे अ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर,१९२५ पृ.क्र.३८

२८. सुर्यवंशी कृ.गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क्र.६०

२९. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.१८-१९

३०. लट्ठे आ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र, बा.ल.पाटील, कोल्हापूर, १९२५ पृ.क्र.३४५

३१. कित्ता - पृ.क्र.३७६

३२. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, २००७,पृ.क्र.७६

३३. गर्गे स.मा. - करवीर रियासत, गो.य.राणे प्रकाशन, पुणे १९८०, पृ.क्र.६३९

३४. Sangave Vilas - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol. VIII (Impetus to Social Legislation and Non-Brahmin Movement) (1918-1919 A.D.), Shivaji University, Kolhapur 2001, Page No.- 187

३५. कित्ता - पृ.क्र.५६४

३६. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.७६

३७. साळुंखे हिंदूराव - छत्रपती शाहू स्मृतिदर्शन, महाराष्ट्र ग्रंथ भंडार, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, जून १९९८, पृ.क्र.१९८

३८. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.७९

३९. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.७१

४०. कित्ता - पृष्ठ क्र. २०३

४१. कित्ता - पृष्ठ क्र. २०२

४२. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१०४

४३. Sangave Vilas. - Rajarshi Shahu Chhatrapati Papers Vol.VII (Implimation of socio-spolitical Scheme (1916-1919), Shivaji University, Kolhapur 1997 Page No.- 43. (Introduction)

४४. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज,युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१०५

४५. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.२०७

४६. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१०६

४७. पवार जयसिंगराव - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७, पृ.क्र.२०९

४८. लट्ठे आ.बा. - श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र,बा.ल. पाटील, कोल्हापूर,१९२५ पृ.क्र.९८

४९. कित्ता - पृष्ठ क्र.१७०

५०. कित्ता - पृष्ठ क्र.१९४- १९५

५१. कित्ता - पृष्ठ क्र.१८७

५२. कित्ता - पृष्ठ क्र.३१४

५३. साळुंखे पी.बी. - राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट राज्य, शिक्षण विभाग, सचिवालय, मुंबई, १९७६, पृष्ठ क्र.२१ (चारशब्द)

५४. नाईक तु.बा. - छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर प्रथमावृत्ती १९७४ पृ.क्र.१०८

५५. सुर्यवंशी कृ. गो. - राजर्षी शाहू राजा व माणूस, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९८४ पृ.क्र.६५३